
फर्डीनिंड आणि चोर


मनरो लीफच्या गोष्टीवर आधारित

लेखक: विन्सेंट जेफर्ड्स

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक







फर्डीनिंड आणि चोर

मनरो लीफच्या गोष्टीवर आधारित

लेखक: विन्सेंट जेफर्डस

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक



फर्डीनंड हा स्पेनमधील एक तरणाबांड आणि ताकदवान बैल.

तो खूप मायाळू होता.

इतर बैलांसारखं त्याला झुंज खेळायला अजिबात आवडायचं नाही.

त्याऐवजी बुचाच्या झाडाखाली बसून फुलांचा सुगंध घ्यायला त्याला खूप आवडायचं.






एक दिवस फर्डीनंड
चुकून मधमाशीवर बसला.



मधमाशीने केलेल्या कडकडून
डंखामुळे तो थाडकन उडाला.



आणि त्याच्या दाणकन आपटण्यामुळे इतर तरुण बैल
दचकून विखुरले गेले.



बैलांच्या झुंज लावण्याचा शर्यती असतात त्या मैदानाच्या बाहेर काही लोक उभे होते. जोरात पळणाऱ्या फर्डीनिंडला पाहून त्यांना वाटले की आतापर्यंत एवढा ताकदवान बैल बघितला नव्हता.



म्हणून ते त्याला शर्यतीतल्या बैलांच्या झुंजीसाठी माद्रिदला घेऊन आले.





परंतु फर्डीनिंडने झुंजीच्या शर्यतीत भाग घेतला नाही.

मैदानात काही फेकलेली फुले पडली होती.

फर्डीनिंड शांतपणे बसून ती फुले हुंगु लागला.



ते पाहून मेटाडोर (बैलांच्या झुंजी लावणारा) संतापला.

त्याने जोरात पाय आपटला.



त्याने रागारागाने फर्डीनिंडकडे पाहिलं.



शेवटी त्याला रडू कोसळले..



त्याने हात जोडून फर्डीनिंडची विनवणी केली पण छे! फर्डीनिंड ढिम्म हलला नाही.



खाली मान घालून फर्डीनिंडने मैदान सोडलं..



फर्डीनिंड आपल्या हिरव्यागार मळ्यात परत आला. घरी आल्यावर त्याला खूप आनंद झाला. मळ्याच्या मालकाची मुलंही त्याला पाहून खूप खुश झाली.


मुलांनी त्याच्यासाठी बाग तयार केली. त्याच्या आवडत्या बुचाच्या झाडाजवळ त्यांनी आणखीन फुलांची झाडं लावली.



दुपारच्या वेळात फर्डीनंड आजूबाजूच्या मुलांना पाठीवर रपेट मारून आणायचा.

एकाच वेळी चौदा मुलांना घेऊन रपेट मारण्याचा विश्वविक्रम त्याच्या नावावर जमा आहे.





फर्डीनंड शेतातही काम करायचा.


सकाळी तो अन्तोनिओला नांगरणी करायला मदत करायचा.

तो इतका बलवान होता की एकावेळी दोन नांगर ओढू शकायचा.


कधी कधी तो दगडांचा ढीग बाजूला करण्याचं काम करायचा.

भले मोठे दगड तो शिंगांनी उचलायचा आणि बाजूला ते दगड ओळीत रचून ठेवायचा.





संध्याकाळ झाली की आपल्या आवडत्या बुचाच्या झाडाखाली शांतपणे फुलांचा सुगंध घेत बसायचा.



रविवारी शेतमालक आणि त्याचे कुटुंब चर्चमध्ये जायचे तेव्हा फर्डीनंड बागेत राहायचा.

बागेत फिरताना फुलं चुरगाळणार नाही ह्याची काळजी घ्यायचा.

एके रविवारी सगळे चर्चमध्ये गेले असताना दोन चोर गाडीने घराजवळ आले.

गेले बरेच आठवडे ते आजूबाजूने टेहळणी करत होते.




"अरे बापरे, तिकडे बघ. एक मोठा मस्तवाल बैल बसलाय!" ठेंगणा-जाडा चोर म्हणाला.


"तोच फर्डीनंड," उंच चोर बोलला. "अरे, तो बैलांच्या झुंजीत सुध्दा नसतो कधी. तू अजिबात घाबरू नकोस."

चोर फर्डीनंड बसला होता तिथून गाडीने पुढे गेले.

फर्डीनंडला काही फरक पडला नाही.

त्याने त्यांच्याकडे पाहून एक सुंदर स्मितहास्य केले.







घरातील सगळ्या किंमती-मौल्यवान वस्तू चोरांनी घोडागाडीत टाकल्या.

काम झाल्यावर तिथून लवकरात निघण्याची त्यांना घाई झाली. जवळचा रस्ता घ्यायचं त्यांनी ठरवलं.

फर्डीनिंडच्या बागेत त्यांनी घोडागाडी घुसवली.





फर्डीनिंडने त्यांना थांबवण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्यावर चोर फक्त हसले.



बागेतील झाडं तुडवत गाडी भरधाव निघाली.

बाग पूर्ण उध्वस्त झाली.


आता मात्र फर्डीनिंडला प्रचंड राग आला.

तो जोराने फुरफुरला. खुरांनी माती बाजूला केली.



आणि चोरांचा पाठलाग करू लागला.

चोर मळ्याच्या बाहेर आले आणि फर्डीनिंडपासून वाचण्यासाठी त्यांनी कसंबसं दार लावून घेतलं.



फर्डीनंड लोखंडी दाराला जोरात धडकला.





फर्डीनंडच्या डोळ्यासमोर चांदण्या चमकल्या.



चर्चमधून घरी परत येत असताना शेतमालकाला चोरांची गाडी जाताना दिसली.

तेवढ्यात शेतमालकाच्या बायकोला त्या गाडीत आपला मेणबत्त्यांचा स्टॅंड दिसला.



चोरांचा पाठलाग करण्यासाठी अन्तोनिओने गाडी वळवून त्यांच्यामागे घेतली.

अन्तोनिओ चोरांच्या गाडीजवळ पोचला.

त्याने ओरडून चोरांना थांबण्यासाठी सांगितले.





तेवढ्यात एक चोराने पिस्तुल रोखले.



"घोड्याचा लगाम सोड आणि हात वर कर," त्याने धमकावले. "आमचा पाठलाग केलास तर याद राख."

इकडे फर्डीनंड अजूनही चोरांवर प्रचंड संतापलेला होता.
त्याला शेतातून बाहेर पडण्याचा दुसरा मार्ग ठाऊक होता.
त्याने धूम ठोकली....




आणि जुन्या लाकडी दाराला धडक देऊन बाहेर आला.



लुटारू निघून गेले. तितक्यात मालकाच्या मुलाला धुळीचे डोंगर दिसू लागले.

ते शेताच्या बाजूने दिसत होते.





क्षणभर त्यांना ते धुळीचं वादळ वाटलं पण अरेच्चा तो तर फर्डीनिंड होता.



फर्डीनिंडने विजेच्या चपळाईने येत चोरांच्या घोडागाडीला जोरदार धडक दिली.

गाडी तुटली आणि वस्तू विखुरल्या गेल्या.

फर्डीनिंडने चोरांना शिंगावर घेतलं आणि झाडावर भिरकावून दिले.



शेतमालक पोलिसांकडे जाऊन येईपर्यंत फर्डीनंड चोरांवर लक्ष ठेवण्यासाठी झाडाखाली बसून राहिला.







पोलिस चोरांना हातकड्या घालून घेऊन गेले.

फर्डीनंड एकदम हिरो बनला.

शहरवासियांनी त्याची कौतुकाने मिरवणूक काढली.

आता त्यांना चोरांपासून कसलीही भीती नव्हती.

